**दक्षिण आफ्रिका भेटीपूर्वी पंतप्रधानांचे प्रस्थान निवेदन**

21 नोव्हेंबर 2025

मी 21-23 नोव्हेंबर 2025 रोजी महामहिम श्री. सिरील रामाफोसा यांच्या निमंत्रणावरुन दक्षिण आफ्रिकेला भेट देत आहे. जोहान्सबर्ग येथे दक्षिण आफ्रिकेच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या 20 व्या G20 नेत्यांच्या शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी ही औपचारिक भेट असेल.

आफ्रिका खंडात आयोजित केली जाणारी पहिलीच G20 शिखर परिषद असल्यामुळे ही शिखर परिषद विशेष ठरणार आहे. कारण वर्ष 2023 मधील भारताच्या G20 अध्यक्षतेदरम्यान आफ्रिकन युनियन G20 चे सदस्य बनले.

ही परिषद प्रमुख जागतिक समस्यांवर चर्चा करण्याची संधी असेल. या वर्षीच्या G20 परिषदेची संकल्पना 'एकजूट, समानता आणि शाश्वतता' अशी आहे. ज्याद्वारे दक्षिण आफ्रिकेने नवी दिल्ली (भारत) आणि रिओ दि जानेरो (ब्राझील) येथे झालेल्या मागील शिखर परिषदेतील फलनिष्पत्तीला पुढे नेले आहे. 'वसुधैव कुटुंबकम' आणि 'एक पृथ्वी, एक कुटुंब आणि एक भविष्य' या आमच्या दृष्टीकोनाच्या अनुषंगाने मी शिखर परिषदेत भारताचा दृष्टीकोन सादर करेल.

भागीदार देशांच्या नेत्यांसोबतच्या संवादाची आणि शिखर परिषदेच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या 6 व्या IBSA शिखर परिषदेत सहभागी होण्याची मी उत्सुकतेने प्रतीक्षा करीत आहे.

या भेटीदरम्यान, भारताबाहेरील संख्येने सर्वाधिक असलेल्या दक्षिण आफ्रिकेतील परदेशस्थ भारतीयांसोबत संवाद साधण्याची मी उत्सुकतेने प्रतीक्षा करीत आहे.

**नवी दिल्ली**

21 नोव्हेंबर 2025